## - संतांची सामाजिक समरसता -

आपल्या अवतीभवती असणाऱ्या समाजाची दुरवस्था पाहून ज्याचे अंतःकरण द्रवते, अशा समाजाच्या उन्नतीसाठी जो आपले तन मन धन अर्पण करतो, तोच खरा संत अशी जर संतपदाची व्याख्या केली तर ती चपखलपणे लागू होईल असे संत म्हणजेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज!

बुडते हे जन देखवेना डोळा।
म्हणुनि कळवळा येतो मनी॥

गावाचा विकास म्हणजेच देशाचा विकास हे मूलगामी तत्त्व उराशी जपणारे आणि त्यासाठी आपले सर्व आयुष्य सार्थकी लावणारे असे हे तुकडोजी महाराज! त्यांच्या दृष्टीने गाव हेच देव आहे आणि माणूस हा गावाचा केंद्रबिंदू आहे. ग्रामजीवन जर सुखी समाधानी झाले तर रामराज्य यायला वेळ लागणार नाही असा मनोमन विश्वास त्यांना होता. आणि सेवेनेच अंगी सामर्थ्य येते हा त्यांचा मूलमंत्र होता. प्रयत्नवाद आणि कर्मनिष्ठा यावर त्यांचा भर होता. स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात जनजागरण करण्याचे मौलिक काम त्यांनी तळमळीने केले.

कोण होते हे तुकडोजी महाराज? अमरावती जिल्ह्यात यावली शहीद या लहानशा गावी २९ एप्रिल १९०९ या दिवशी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत या माणकाचा जन्म झाला हो! या बाळाचे नाव माणिक बंडोजी इंगळे (ठाकूर). लहानपणापासूनच भजने रचण्याची व गाण्याची आवड होती. नदीच्या काठी जाऊन, फरशीच्या दोन चपट्या तुकड्यांचा ठेका धरून हा मुलगा भजने गायचा. त्यांचे गुरु आडकोजी महाराज यांनी त्याला तुकड्या म्हणायला सुरुवात केली.

गावातील अज्ञान, दारिद्र्य, अस्वच्छता, व्यसनाधीनता जवळून पाहिली असल्याने त्याविषयी त्याला तिटकारा होता. त्याचबरोबर निसर्ग, प्राणी, जीवजंतु यांच्याविषयी विलक्षण प्रेम होते. स्वावलंबनाचे व सेवेचे महत्त्व पटलेले होते. गावातील दैन्य दूर व्हावे हा ध्यास मनात होता. त्यामुळे त्यांनी ग्रामसुधारणेचा निश्चय केला. 'आधी केले मग

© www.madhaveeraghuveer.com

सांगितले' या न्यायाने आपल्या वागणुकीने लोकांसमोर आदर्श उभा केला. गाव बदलायचे होते.

त्यासाठी त्यांनी माध्यम निवडले ते भजनाचे! संगीताची जाण उपजतच होती. आधी ग्रामविकास, व त्यातून राष्ट्रविकास साधायचा होता. अनेक अडथळे होते. त्यावर मात करण्यासाठी प्रेरणा देणारी, अनेक विषयांना स्पर्श करणारी भजने त्यांनी रचली. आणि आपल्या भरदार पहाडी आवाजामध्ये ती लोकांसमोर म्हटली. लोकांना ती इतकी आवडली की लांबून लोक भजन ऐकण्यासाठी येऊ लागले. भजनाचे असे हजारो कार्यक्रम होऊ लागले. खंजिरी या वाद्याला तर त्यांनी अजरामर केले. एका वेळेस दोन हातांनी दोन खंजिऱ्या ते वाजवत असत. त्यांची धिप्पाड देहयष्टी, निरागस हास्य, गोड आवाज, अनुरूप देहबोली यातून लोकांची मने ते जिंकून घेत असत. भजनाला लोकप्रियता मिळावी यासाठी त्या भजनांना ते सिनेसंगीताच्या चाली लावत असत. त्यामुळेच अनेक विषय लोकांपर्यंत पोहोचत. खादी, ग्रामोद्योग, समता, विश्वबंधुत्व, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा असे अनेक विषय भजनाच्या माध्यमातून लोकांसमोर मांडले. त्यातून जनजागरण केले. या भजनांमुळे लोकांचे केवळ रंजनच नाही तर हृदयपरिवर्तन होत असे आणि आपोआप वागण्या बोलण्यातही बदल घडत असे. सामान्यांप्रमाणेच अनेक असामान्य व्यक्तीदेखील त्यांच्या भजनाच्या चाहत्या होत्या. म. गांधी, पं. नेहरू, लाल बहादूर शास्त्री यांच्यापासून ते साने गुरुजी, प्र. के. अत्रे, गो. नी. दांडेकर अशांसारखे साहित्यिकही भजने ऐकायला आवर्जून येत असत. राष्ट्रपती-भुवनात झालेल्या भजन कार्यक्रमाने प्रभावित झालेल्या डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांचे भरघोस कौतुक करून त्यांना 'राष्ट्रसंत' ही सार्थ पदवी दिली. जपानमध्ये भरलेल्या धर्म परिषदेमध्ये तुकडोजी महाराजांनी भारताचे प्रतिनिधित्व केले.

माणसातील माणुसकी जपणे हाच त्यांनी आपला धर्म मानला. इतर कोणताही धर्म, जात, पंथ, संप्रदाय यांच्या

© www.madhaveeraghuveer.com

पलीकडे जाऊन माणूस जोडण्याचे काम त्यांनी अव्याहतपणे केले. गावागावी भजनाचे कार्यक्रम करत ते देशभरात पोहोचले. भजनाबरोबरच गीते, अभंग, भारुड या सर्व क्षेत्रात त्यांची घोडदौड सुरु होती परंतु या सर्वांमध्ये मेरुमणी ठरावी अशी त्यांची रचना आहे. ती म्हणजे ग्रामगीता।

ग्रामगीता म्हणजे प्रत्यक्ष भगवंतांनी जनतेशी केलेला 'मित्रसंवाद' आहे. किंवा भारतीय जनतेचे उघडे ज्ञानपीठ म्हणजे ग्रामगीता असेही म्हणता येईल. यात त्यांनी श्रेयसापेक्षा प्रेयसाचा विचार केला आहे यातच त्यांचे वेगळेपण आहे. सामान्य माणसाचे रोजचे जीवन, त्यात शिरलेले दोष आणि त्यावर सुचवलेले उपाय यावर त्यांनी आपल्या सहज शैलीत भाष्य केले आहे. आणि सर्वसामान्यांना हेच हवे असते. हुंड्यासारख्या अनिष्ट रूढींवर कोरडे ओढले आहेत. तसेच सामुदायिक विवाहासारखे उपायही सुचवले आहेत. स्त्रियांना शिक्षण मिळावे हे आग्रहाने सांगताना स्त्रीच्या मर्यादाही ते अधोरेखित करतात. सणवार, उत्सव, मेळे, यात्रा, रामधून या साऱ्यांच्या गाभ्याशी असणारी आधारभूत तत्वे त्यांनी ग्रामगीतेत थेटपणे मांडली आहेत. त्यांची भाषा जिव्हाळ्याची आहे. परंतु गैर प्रकारांबद्दल बोलताना ते कधीकधी फटकारे मारतात. मात्र ही दटावणी ~~प्रेम~~ प्रेमळ पित्याची आहे. त्यांनी जनसामान्यांच्या अंतःकरणाला साद घातली आहे. ग्रामसुधारक, समाजसेवक, मानवतेचा हितकर्ता अशा विविध नात्याने ते ग्रामगीतेतून आपल्याला सदैव भेटत रहातात.

समाजाशी समरस झाल्याखेरीज इतकी आर्तता लेखनात येणे शक्यच नाही. प्रथम माणूस सुधारला पाहिजे. त्यानंतर आपोआपच त्याचे घर, त्याचा परिसर, त्याचे गाव, त्याचे राज्य आणि त्यानंतर राष्ट्र सुधारेल. त्याही पुढे जाऊन विश्वबंधुत्वाची कल्पना त्यांनी मांडली आहे. संपूर्ण जग जर सहृदय व समजूतदार झाले तर युद्धाला पूर्णविराम मिळेल. असा या द्रष्ट्या संताचा आशावाद आहे. तो सार्थ ठरविण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे.